दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३३१ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.११ सप्टेंबर२०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# रिपाईला विधानसभेत योग्य प्रतिनिधित्व द्या-केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**पुणे (वृत्तसंस्था)–लोकसभा निवडणुकीत एनडीएला अपेक्षित यश मिळाले नसले, तरी आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. आम्हाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळाल्यास त्याचा फायदा महायुतीमधील तीनही पक्षांना निश्चित होईल, असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी मंगळवारी व्यक्त केला.रामदास आठवले यांनी पुण्यातील व्हिआयपी विश्रामगृहात एक पत्रकार परिषद घेतली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य संघटक परशुराम वाडेकर, सूर्यकांत वाघमारे, गौतम सोनवणे, शैलेश चव्हाण, अशोक शिरोळे, श्याम सदाफुले, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, वसंत बनसोडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.**



रामदास आठवले पुढे म्हणाले की, सध्या पुण्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सव हा सर्व धर्मीयांच्या एकतेचे आज प्रतीक बनला आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार देशातील नागरिकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. मोदी सरकारच्या धोरणांमुळे आज देशातील २५ कोटी लोकांना आम्ही गरीबीच्या बाहेर आणू शकलो. शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून आम्ही १३ हजार कोटी रुपये आजवर दिलेले आहेत. दहा लाख लोकांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये एसी-एसटीच्या उमेदवारांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

आठवले यांनी सांगितले की, गेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा प्राप्त झाल्या नाहीत. संविधान बदलाचा मुद्दा विरोधकांनी जोरदारपणे लावून धरल्यामुळे जनतेत एक वेगळा संदेश गेला. तसेच मराठा आंदोलनाचाही फटका महायुतीला बसला होता. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत मात्र चित्र उलटे दिसून येईल.दरम्यान, इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारक पूर्ण करण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने साडेतीन हजार कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. हे भव्य स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी व्यक्तीशः प्रयत्नशील आहे. येत्या दोन वर्षांमध्ये हे स्मारक पूर्ण झालेले सर्वांना दिसून येईल.

सध्या महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून मोठे रणकंदन होते आहे. परंतु मराठा समाजाला आरक्षण प्राप्त व्हावे, ही केंद्र व राज्य सरकारची खूप इच्छा आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी उठसूठ आंदोलनाची धमकी देण्याऐवजी त्यांनी सरकारला योग्य ते सहकार्य करावे.आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रिपाइंच्या वतीने महायुतीतील पक्षांकडे १२ जागांची मागणी केली आहे. ही मागणी त्यांनी पूर्ण करावी, त्याचे कारण हे की, रिपाइंमुळे महायुतीतील तीनही प्रमुख पक्षांना चांगला फायदा होणार आहे. त्यामुळे या सर्व पक्षांनी आपापल्या कोट्यातील चार-चार जागा आम्हाला द्याव्या, अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

## चिचाळा येथील असोलामेंढा कालव्याची पाईपलाईन तातडीने दुरुस्त करा

### पालकमंत्री मुनगंटीवार यांचे कार्यकारी अभियंत्यांना निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

असोलामेंढा तलावाच्या मुख्य कालव्यातून येणारी चिचाळा ते हळदी दरम्यान नळजोडणी पाईपलाईन फुटल्यामुळे येथील शेतक-यांना सिंचनापासून वंचित राहावे लागत आहे. ही बाब शेतकऱ्यांनी पालकमंत्री ना .मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आणून देताच सदर नळजोडणी पाईपलाईन त्वरीत दुरुस्त करण्याचे निर्देश वने व सांस्कृतिक कार्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्रीश्री. सुधीर मुनगंटीवार यांनी असोलामेंढा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.

चांदा ते बांदा या प्रकल्पांतर्गत पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नांतून असोलामेंढा तलावाच्या मुख्य कालव्यातून नळजोडणी मार्फत मुल तालुक्यातील गावातील शेतीसाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात



आली आहे. ना. मुनगंटीवार यांच्याकडे राज्याच्या अर्थखात्याची जबाबदारी असताना ही योजना मंजूर झाली होती, हे विशेष.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चांदा ते बांदा विशेष कार्यक्रमांतर्गत मुल तालुक्यातील चिचाळा व नजिकच्या गावांसाठी असोलामेंढा कालव्यातून नळजोडणी पाईपलाईन टाकण्यात आली. चिचाळा, ताडाळा, हळदी, दहेगाव मानकापूर गावांना शेतीसाठी सिंचन सुविधा पुरविण्यासाठी २३ कोटी ४७ लक्ष ५४ हजार खर्च करण्यात आले. ही पाईपलाईन चिचाळा हळदी दरम्यान फुटल्यामुळे सिंचनाचे पाणी उपलब्ध होत नाही, अशी तक्रार शेतकऱ्यांनी केली. ही बाब ना. मुनगंटीवार यांना कळताच त्यांनी असोलामेंढा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अशोक पिदुरकर यांना सिंचनाची नळजोडणी पाईपलाईन तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश दिले.

## ईव्हीएम-व्हीव्हीपॅट जनजागृती मोहिमेचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शुभारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने, नागरिकांमध्ये इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) व व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत जनजागृती मोहिम सुरू करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात १० सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार्या या मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. या प्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, नगर प्रशासन अधिकारी विद्या गायकवाड, नायब तहसीलदार (निवडणूक) तुषार मोहुर्ले, प्रभाकर गिज्जेवार, आशिष बाचमपल्लीवार, गौरव निखारे तसेच निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या जनजागृती मोहिमेद्वारे जिल्ह्यातील २०७६ मतदान केंद्रांपैकी १२८० ठिकाणी तसेच शाळा, महाविद्यालये, रेल्वे स्टेशन, बस स्थानक, गावातील मुख्य चौक, बाजार नाका, शासकीय कार्यालये,



सभेची ठिकाणे इत्यादी मोक्याच्या ठिकाणी फिरत्या वाहनाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये मतदान प्रक्रियेचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके देखील दाखवण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व नागरिक व मतदारांनी ईव्हीएम व व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत माहिती मिळवून मतदान प्रक्रियेतील शंका निरसन करावी, यासाठी ही मोहिम कार्यान्वित करण्यात आली आहे. या मोहिमेचा लाभ सर्व मतदारांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
प्रस्तुत
गणेश महोत्सव २०२४
सह्याद्रीचा राखणदार
बाप्पाच्या दारी
गणेश भक्तांसाठी एक खास आणि भव्य उत्सव



Scan Me
दैनिक सह्याद्रीचा राखणदार
GTPL Digital Cable TV | Broadband
TV CHANNEL NO 988
Print I TV I Video Online I Live I Events
www.sahyandrinews.com / epaper.sahyandrinews.com
9011708840 II I @sahyandricharakhandar

## नाशिक मध्य मतदारसंघावरुन रस्सीखेच:अजय बोरस्ते आमदार व्हावे;शिरसाट यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

**नाशिक । वृत्तसंस्था**

मी अजय बोरस्ते यांच्या वाढदिवसाला आलो यांचे कारण थोडे समजून घ्या. ज्यांचे भवितव्य चांगले आहे मी त्यांच्याकडेच जात असतो, त्यांचे भवितव्य चांगले आहे. अजय बोरस्ते आमदार झाले पाहिजे, ते आमच्याबरोबर दिसले पाहिजे अशा शुभेच्छा देतो म्हणत शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी अजय बोरस्ते यांच्या उमेदवारीबद्दल सूचक विधान केले आहे.

दरम्यान संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, अमित शहा हे केवळ लालबागच्या दर्शनासाठी मुंबईत आले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांनी राजकीय चर्चा झाली. मात्र, जागावाटपाबद्दल आमच्यात तिढा नाही, त्यांनी जागबा वाटप केलेले नाही, असे आमदार शिरसाट यांनी स्पष्ट केले आहे. संजय शिरसाट म्हणाले की, हेमंत गोडसे हे आमच्यासोबत आहेत, ते आठवड्यातून एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा करतात त्यांच्या संपर्कात असतात ते कुठेही जाणार नाही. लवकरच त्यांच्यावर वेगळी जबाबदारी देण्यात येईल असे सूचक वक्तव्यही त्यांनी यावेळी केले आहे.संजय शिरसाट म्हणाले की, मी पहिल्यांदा असा राज्यपाल पाहिला जो सर्वसामान्य माणासांच्या भावना जाणूण घेत आहे. राज्यपाल महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रयत्नशील असून ते उद्योगपती आणि जनतेला भेटून राज्याचा विकासाबद्दल चर्चा करत आहे. महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे राज्यपाल आपल्याला लाभले हे आपले सौभाग्य आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

शिंदे गटाचे नाशिक जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते हे नाशिक मध्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. या मतदारसंघातून भाजपच्या देवयानी फरांदे आमदार आहेत. यामुळे महायुतीत तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. पक्षाने संधी दिल्यास नाशिक मध्य विधानसभेतून निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे अजय बोरस्ते यांनी म्हटले आहे. आता नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून नक्की कोणाला उमेदवारी मिळणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मला कोणत्याही क्षणी अटक करतील:फडणवीस अतिशय खालच्या स्तरावर राजकारण आणत असल्याची अनिल देशमुखांची टीका

**नागपूर (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मला अडकवण्यासाठी प्रयत्न करत असून त्यासाठी पोलिसांवर दबाव टाकला जात आहे. त्यामुळे मला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता असल्याचे माजी मंत्री अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना अनिल देशमुख यांच्याकडून भाजप नेते गिरीश महाजन यांना खोट्या गुन्हात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात अनिल देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या प्रकरणात देशमुख यांनी फडणवीसांवर गंभीर आरोप केले आहेत.

देवेंद्र फडणवीस हे मागील चार वर्षे पूर्वीची घटना उकरून काढत असून माझ्याविरुद्ध दिल्लीच्या मदतीने सीबीआयमध्ये गुन्हा दाखल केला आहे. चार वर्षांपूर्वी मी गृहमंत्री असताना जळगावच्या एका घटनेमध्ये भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर कारवाई करण्यासाठी मी जळगावच्या पोलिस अधिकाऱ्यावर दबाव टाकला होता, असा आरोप माझ्यावर करण्यात आला आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार माझ्यावर रेट टाकून मला अटक करण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केला आहे. दिल्लीच्या मदतीने ते ईडी आणि सीबीआयला हाताशी धरून महाराष्ट्राचे राजकारण अतिशय खालच्या स्तरावर आणत असल्याची टीका देखील अनिल देशमुख यांनी केली आहे.

मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषदेच्या



माध्यमातून महाविकास आघाडीचे सरकार असताना तसेच अनिल देशमुख गृहमंत्री असताना माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. मोक्का अंतर्गत मला अटक करण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकण्यात आला होता, असा आरोप देखील गिरीश महाजन यांनी केला होता. तसेच हा संपूर्ण प्रकार प्रवीण मुंडे यांनी माझ्या लक्षात आणून दिल्यानंतर मी अनिल देशमुख यांना जाब देखील विचारला होता. असा दावा देखील गिरीश महाजन यांनी केला आहे. आता या प्रकरणाची नुकतीच सीबीआयकडून चौकशी करण्यात आली आहे. अनिल देशमुख यांच्या विरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता या प्रकरणात अनिल देशमुख यांच्या अडचणी वाढल्या असल्याचे बोलले जात आहे.

# विविध स्पर्धा व उपक्रमांसाठी मनपाद्वारे भरीव योगदान देवू आयुक्त धैर्यशील जाधव : शटल बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन

**परभणी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये आत्तापासूनच खेळाची आवड निर्माण होणे गरजेचे आहे. शहरात विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा साठी प्रयत्न करण्याचे काम सर्वच शाळांनी करावेत, यासाठी महापालिका प्रशासन या स्पर्धांसाठी व उपक्रमांसाठी भरीव योगदान देऊन सहकार्य निश्चितच करेल, असे आश्वासन महापालिका आयुक्त धैर्यशिल जाधव यांनी दिले.

शहरातील जिल्हा क्रीडा संकुलाच्या शटल बॅडमिंटन हॉल येथे आयोजित सेटल बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आयुक्त जाधव, कार्यक्रमाचे अध्यक्ष बॅडमिंटन असोसिएशन सचिव रविंद्र पतंगे, बॅडमिंटन असोसिएशन उपाध्यक्ष सुनील देशमुख, क्रीडाशिक्षक पंडित, क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, मनपाचे क्रीडा विभाग प्रमुख राजकुमार जाधव, मनपाचे लेखाधिकारी अमोल सोळंके, राजाभाऊ कामखेडे, बॅडमिंटन प्रशिक्षक उमेश गाडेकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.पुढे बोलतांना आयुक्त जाधव यांनी, दररोजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाच्या मागे ताणतणाव निर्माण झाला आहे. या सर्व ताणतणावापासुन दुर राहण्यासाठी खेळाची किंवा कुठल्यातरी छंद जोपासण्याची गरज आहे. शहरातील विविध प्रकारचे क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रम तसेच महिला बालकल्यांसाठी राबविल्या जाणार्या स्पर्धांमध्ये महापालिका योगदान देऊन येथील चळवळीला भर देणार आहे. त्यामुळेच शालेय विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करण्याचे काम मनपाच्या क्रीडा विभागाने केले आहे. यापुढेही असे स्तुत्य उपक्रम राबविण्याचे निश्चित प्रयत्न केले जातील, असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालाजी मनोलीकर यांनी केले. आभार क्रीडा विभाग प्रमुख राजकुमार जाधव यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उमेश गाडेकर, राजभाऊ कामखेडे, योगेश जोशी, तुकाराम शेजुळ, अजय कदम, आदित्य गायकवाड, निलेश राठोड, बालाजी मनोलीकर, शेख अन्वर, सय्यद सादेक, कैलास काकडे, पांडुरंग दुधाटे, आशिष परदेशी यांनी परिश्रम घेतले.




# संतप्त आंदोलकांनी मानवत तहसील कार्यालयाचे गेट बंद करून केले आंदोलन

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत तालूक्यातील शेतकर्यांचे पंचनामे होत नसल्याने मानवतचे तहसीलदार आणि कृषी अधिकारी यांना शेतकऱ्यानी तहसिलच्या गेटवर अडवले दोन दिवसत पीक विमा प्रतनिधी सरवे करतील व सरसगट शेतकर्यांना मदतीची मागणी असल्याचे जिल्हाधिकारी यांना कळवण्याचे लेखी आश्वासन दिल्या नंतरच संतप्त आंदोलकांनी मानवत तहसिलचे गेट उघडले यावेळी



रंगनाथ सोळंके यांच्या नेतृत्त्वात आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवाजीराव बोचरे, मधुकरराव अवचार, माऊली धोपटे, रामेश्वर काळे, हनुमान शिंदे, कृष्णा भैया शिंदे, माऊली आंबेगावकर, सुभाषराव जाधव, मुकुंदराव मगर, मुंजा भाऊ सुरवसे, हरिभाऊ निर्वळ, यांच्या सह मानवत तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

# शासकीय विश्रामगृहावर सकल मूस्लिम यूवक कृतिसमितीची महत्वाची बैठक संपन्न

## सकल मुस्लिम युवक कृति समितिच्या बैठकीला मुस्लिम यूवकाची उपस्थिती

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आगामी विधानसभा निवडणुकीसंदर्भात सकल मुस्लिम युवक कृति समिति मानवत तालुका यांची दि. ८ सप्टेंबर रविवार रोजी महत्वाची बैठक संपन्न झाली.



या महत्वपूर्ण बैठकी मध्ये आगामी विधानसभा निवडणूकसंदर्भात चर्चा करण्यात आली. या वेळी वसीम कुरेशी, महेबुब मंसुरी, यांनी मार्गदर्शन केले तर परवेज शेख, मुश्ताक अल्लाह रखखा, इलियास पठान, मुकद्दर खान, मसुद कुरेशी, यांनी आप आपले विचार मांडले या वेळी वाजेद शेख, सईद लाला, वहाब कुरेशी, मुजाहेद फारूकी, शेख अहेमद, अलीम चौधरी, सुल्तान मंसूरी, व सकल मुस्लिम युवक कृति समिति मानवत तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते व मूस्लिम युवक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांचा ठाकरे गटाला रामराम


**वैजापूर | प्रतिनिधी**

तालुक्यातील माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून आमदारपद भूषवलेल्या तात्यांनी २०२२ साली ठाकरे गटात प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु, काही कार्यकर्त्यांनी पक्षप्रमुखांकडे तात्यांच्या विरोधात तक्रार केल्यामुळे त्यांची उमेदवारी धोक्यात आली आहे.

तात्यांनी ठाकरे गटाला रामराम ठोकत पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. पत्रकारांनी विचारले की, ठाकरे गट सोडल्यानंतर ते कोणत्या पक्षात प्रवेश करतील? यावर तात्यांनी उत्तर दिले की, माझे कार्यकर्ते जे ठरवतील, तेच मी करीन.

तात्यांना विचारण्यात आले की, शरदचंद्र पवार यांच्या गटाने उमेदवारी दिल्यास ते त्या गटात प्रवेश करतील का? यावर तात्यांनी सांगितले, जर मला विचारणा झाली तर मी हो म्हणेन; नाहीतर जर जरांगे पाटलांकडून उमेदवारी आली, तर त्यांच्याकडून निवडणूक लढवेन.तात्यांनी मराठा समाजासाठी ओबीसी आरक्षण मिळवण्यासाठीची भूमिकाही स्पष्ट केली आणि म्हटले, मी मराठा आहे, पण जरांगे पाटलांच्या कृपाशीर्वादाने मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळणार आहे.

जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे यांनी तात्यांना अजित पवार गटात प्रवेश करण्याचा सल्ला दिला होता, परंतु तात्यांनी त्याला प्रतिसाद देताना सांगितले, तो मला सांगणारा कोण आहे? त्याला तालुक्यात आणि जिल्ह्यात कोणतेही पद नाही. जर अजित दादा म्हणाले, तर मी विचार करीन.शेवटी, तात्यांनी स्पष्ट केले की, कोणीही उमेदवारी दिली नाही, तर मी माझ्या कार्यकर्त्यांशी चर्चा करीन. जर त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचे सांगितले, तर मी अपक्ष म्हणून निवडणूक लढवेन. तात्यांच्या या विधानांमुळे त्यांची पुढील राजकीय वाटचाल काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# अकोलेत निळवंड धरणावरून शरद पवार गटाचे चाकबंद आंदोलन

**अकोले**–आकोले येथील निळवंड धरणाच्या निकृष्ट कालव्यांच्या कामाविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाने चाकबंद आंदोलन केले. यावेळी माजजी जिल्हा परिषद सदस्या सुनीता भांगरे यांच्या नेतृत्वात महिलांनी आक्रमक भूमिका घेत हातात दगड घेऊन कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला. आवर्तन बंद केले नाही तर पाण्यात उड्या मारण्याचा इशाराही यावेळी आंदोलकांनी दिला आहे.

शरद पवार गटाचे आंदोलक निळवंड धरणाच्या चाकापर्यंत पोहोचले होते. अनेकवेळा मागणी करूनही कार्यवाही होत नसल्याने हे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी आंदोलकांनी हातात दगड घेत कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना गेटजवळच अडवून धरले, मात्र आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत डाव्या कालव्याचे पाणी बंद करण्याची मागणी केली आहे. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या सुनीता भांगरे म्हणाल्या, गेल्या दोन वर्षांपासून या ठिकाणी उजवा आणि डाव्या कालव्यातून पाणी सुरू आहे. मात्र या विभागाने पाणी पाटात सोडले आहे की घरात हेच कळत नसल्याची टीका त्यांनी केली आहे. आम्ही तिसऱ्यांदा आंदोलन करत आहोत. मात्र प्रशासन केवळ आश्वासन देऊन वेळ मारत आहे. मागच्या वेळेस आंदोलन केले तेव्हा सांगितले की, दुसऱ्या रोटेशन चालू होईल तेव्हा पाटाचे काँक्रिटीकरण होणार आणि पूल बांधणार, मात्र कुठलेही काम झालेले नाही, असे सुनीता भांगरे यांनी सांगितले.पुढे बोलताना सुनीता भांगरे म्हणाल्या, शेतकऱ्यांच्या घरात पाणी शिरले आहे. मुलांना शाळेत जाता येत नाही. आमची आता हीच मागणी आहे की मागच्या वेळेस झालेल्या पंचनाम्याचा मोबदला शेतकऱ्यांना मिळवा. पुन्हा आवर्तन सुरू होण्याआधी काँक्रिटीकरण आणि पुलाचे काम झाले पाहिजे. आज पाणी बंद केले नाही तर आम्ही सर्व महिला या पाण्यात उड्या मारू, असा थेट इशाराच सुनीता भांगरे यांनी दिला आहे.यावेळी बोलताना सुनीता भांगरे यांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेवरही टीका केली आहे. सुनीता भांगरे म्हणाल्या, शेतकऱ्यांच्या हिताचा एकही निर्णय गेल्या अडीच वर्षात या सरकारने घेतला नाही.


# देवेंद्र फडणवीसांनी फक्त सगे सोयऱ्यांची मागणी मान्य करावी

## मी राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही–मनोज जरांगे

**बीड | प्रतिनिधी**

मराठा आरक्षण लढाई अंतिम टप्प्यात आली असून जनसामार्थ्य एकत्र करण्यासाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील ठिकठिकाणी घोंगडी बैठका घेत आहेत. बीड येथील सोमवारी झालेल्या बैठकीत जरांगे पाटील यांनी सांगितले की, पुढचे तीन महिने मराठ्यांच्या अस्मितेचे असून निवडणूक लढवायची की नाही हे लवकरच आपण ठरवू असे सांगितले.

अ बीडच्या बैठकीत बोलतांना जरांगे पाटील म्हणाले की, फडणवीस साहेबांनी फक्त गेसोयर्यांची मागणी मान्य करावी आणि मराठ्यांना आरक्षण द्यावं, मी त्यापुढे राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. फडणवीसांनी आपल्याविरोधात मराठा आमदार उभे केलेत, त्यांनी जर आरक्षण दिलं नाही तर त्यांना राजकारणात लोळवल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये झालेल्या घोंगडी बैठकीमध्ये मनोज जरांगे यांनी हे वक्तव्य केलं. गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. गरीब मराठा सगळा बाजूला गेलाय. श्रीमंत मराठ्याला गरीब मराठा जमत नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.



देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्हाला गरिबांची मुलं मोठी व्हावेत असं का वाटत नाही? या सरकारमधील मंत्र्यांना गरिबांची पोरं मोठी होऊ नयेत असं का वाटतं? तुम्हाला फक्त तुमचा पक्ष आणि नेते मोठे करायचे आहेत. देवेंद्र फडणवीस, मराठ्याच्या मुलांनी तुमचं काय वाकडं केलं? मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या विरोधात उभे केले. कुठे केसेस करत आहे, कुठे मराठ्यांचे आमदार विरोधात उभे करता. फडणवीस साहेब तुम्हाला लोळवल्याशिवाय आता मराठा समाज मागे हटत नाही. जर तुम्ही आरक्षण दिले नाही तर आम्हाला सत्ता काबीज करावी लागणार. मराठा समाज्याच्या आरक्षणासाठी वाटेल ते करेन.देवेंद्र फडणवीस साहेब, मी राजकारणाचा एक शब्द काढत नाही, तुम्ही फक्त आरक्षण द्या. मी पुन्हा यावर बोलणार नाही. तुम्ही आरक्षण दिलं नाही तर मग मी राजकीय बोलणार असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.तुम्ही ज्या पक्षात काम करत आहे त्या पक्षाचे नेते आम्हाला का आरक्षण देत नाहीत? असा सवाल आता भाजपमधल्या पुढार्यांना त्यांची लेकरं विचारतील असं जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, तुमच्या लेकरांवरील अन्याय कायम डोळ्यासमोर ठेवा. माझ्या विरोधामध्ये भरपूरजण उभे केले आहेत. आठवड्यालाच आमदार बदलतात. बैल बदलले जात आहेत.गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, हे तीन महिने मराठ्यांचे अस्मितेचे आहेत भविष्याचे आहेत. लढाई माणूस केवळ बेसावध राहिल्यामुळे हरतो. उद्यापासून गावागावात २० पोरांची टीम तयार करा. ज्या गावात अशा टीम तयार होतील त्याच गावात घोंगडी बैठका होतील. गरीब मराठा सगळा बाजूला गेलाय. श्रीमंत मराठ्याला गरीब मराठा जमत नाही. आचारसंहिता लागण्यापूर्वी आठ दिवस आधी आपण बैठक घेवू आणि मग ठरवू की आपण निवडणूक लढवायची का नाही.पुढे बोलताना जरांगे म्हणाले जातीयवादी आधिकर्यांनी अंतरवाली सराटीमध्ये लेकरा-बायांना मारले. ज्यांनी मराठ्यांना मारले त्यांना तुम्ही बढती दिली हे समाज विसरणार नाही. समुद्रसारखी काँग्रेस गेली, तुम्ही गर्वात राहू नका. पोलीस लाठीचार्ज करतात, हल्ले करतात. हा जीवघेणा हल्ला फडणवीसांनी जाणून बुजून करवून आणला असा आरोप मनोज जरांगे यांनी केला.मराठ्यांचा तोल सुटला तर हे आमदार चटणीला पण उरणार नाही. मी मराठ्यांच्या पोरांना शांत राहायला सांगतोय. फडणवीससाहेब, एकदा का मराठा समाज रस्त्यावर उतरला की तुम्हाला जमिनीवर पण पाय ठेवू देणार नाहीत असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.पुढे ते म्हणाले भाजपचे नेते तर म्हणतात मी लई खुनशी आहे. मग भाजपचे नेते रात्रीच येतात आणि गोधडीमधून उठवतात आणि हे फडणवीस साहेबांना माहितीच नाही असं जरांगे म्हणाले. भाजपमधील इतकी लोक बाहेर आहेत की एकेदिवशी सगळेच आपल्याकडे येतील. तुम्ही एकदा पाडून ताकत दाखवली. मराठ्यांना हारू देवू नका असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

## महानगरपालिकेच्या अन्यायकारक करवाढीला शासनाचा 'स्टे'

# मनपा आयुक्तांनी त्वरित आदेश काढून जनतेला दिलासा द्यावा-शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे

**अमरावती । प्रतिनिधी**

शासनाने अमरावती महानगरपालिकेच्या अन्यायकारक कर वाढीचा पुनमूल्यांकन स्थगित करण्याबाबत शासनादेश न काढता केवळ एक पत्र पाठवून अमरावतीकरांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न केला आहे. करवाढीबाबत शासनाने काढलेल्या या पत्रात कोणतीही सुस्पष्टता नसून, हे त्रोटक पत्र शासनाकडून केव्हाही सुधारित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पत्रानुसार तात्काळ तीन दिवसात आयुक्तांनी आपल्या स्तरावरून कर वाढीसंदर्भात आदेश काढून अमरावतीच्या सामान्य जनतेला अन्यायकारक करवाढीपासून मुक्तता द्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अमरावती महानगरपालिकेने अवाढव्य कर आकारणी करून सर्वसामान्यांना आर्थिक संकटात टाकले आहे. महानगरपालिकेच्या अन्यायकारक वाढीव मालमत्ता कराच्या प्रक्रियेला शासनाने स्थगिती दिल्याचे शासनाच्या उपसचिवाचे पत्राचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की शासनाने या करवाढीबाबत घेण्यात आलेल्या ठरावाच्या स्थगन किंवा रद्दबाबत कोणतेही भाष्य पत्रात केलेले नाही. याउलट, फक्त २०२४ च्या कर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेला स्थगिती दिल्याचे नमूद आहे. कर पुनर्मूल्यांकन प्रक्रिया ही मार्च २०२३ पूर्वीच पूर्ण झाली असून, आता फक्त कर वसुलीचे काम सुरू आहे. वास्तवात, या अन्यायकारक करवाढीच्या स्थगनासाठी किंवा रद्द करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतूदांचे स्पष्ट उल्लेख करून संबंधित ठरावाला व महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाला स्थगिती दिल्याबाबतचा शासनादेश काढणे आवश्यक होते.



अशा परिस्थितीत, मनपा आयुक्तांनी या पत्राच्या आधारावर स्पष्ट आदेश काढून वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेले वाढीव कर दर रद्द करून जुन्या दराने नागरिकांनी कर भरण्याबाबत आदेशित करावे. तसेच, आजपर्यंत वाढीव कर दराने भरण्यात आलेल्या कराबाबत स्पष्ट आदेश देऊन पुढील वर्षाच्या कर मागणीमध्ये समायोजित करण्यात यावे किंवा नागरिकांनी पूर्वीच्या करापेक्षा जास्तीचे भरलेल्या कर रक्कम परत करण्यात यावी असे उल्लेख करावे व त्याबाबतचे प्रमाणपत्र नागरिकांना देण्यात यावे. याबाबत एखाद्या नागरिकांनी पूर्वीपेक्षा दहापट जास्त दराने कर भरला असल्यास संबंधितांना पुढील दहा वर्ष कर भरण्याची आवश्यकता राहणार नाही अशा पद्धतीचे प्रमाणपत्र द्यावे किंवा त्यांचे अतिरिक्त घेतलेले रक्कम परत करण्यात यावी, जेणेकरून या जाचक कर वाढीपासून नागरिकांना मुक्तता मिळेल.त्यामुळे आयुक्तांनी शासनाने कर पुनमूल्यांकनाच्या बाबतीत स्थगित करण्याबाबत दिलेल्या पत्रानुसार तात्काळ तीन दिवसात वरीलप्रमाणे आपल्या स्तरावरून आदेश काढून अमरावतीच्या सामान्य जनतेला अन्यायकारक करवाढीपासून मुक्तता द्यावी अशा आशयाचे निवेदन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.


> **"अमरावती महानगरपालिकेने लादलेल्या जाचक कर वाढीसंदर्भात गेल्या वर्षभरापासून आम्ही लढा देत आहोत. याची किंवा उशिरा जाग आलेल्या लोकप्रतिनिदिंच्या प्रयत्नांची दखल घेऊन शासनाला या आदेशाला स्थगिती देणारे पत्र निर्गमित करावे लागले. सर्वसामान्यांच्या हिताच्यादृष्टीने आयुक्तांनी या पत्राची दखल घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्याची ते तत्काळ दखल घेतील अशी अपेक्षा आहे. अन्यथा पुढील भूमिका ठरवू.**
> **सुनील खराटे**
> **जिल्हाप्रमुख, शिवसेना अमरावती**

## पंढरपुरात केजाजी महाराजांचा जयघोष

# संत केजाजी महाराज दिंडीचा तपपूर्ती सोहळा उत्साहात साजरा होणार

**सेलू । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीला घोराड येथून पंढरपूरकडे दरवर्षी पायदळ जाणारी संत केजाजी महाराजांची दिंडी यंदा एका तपाचा टप्पा पूर्ण करत आहे. या तपपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने पंढरपुरात संत केजाजी महाराजांच्या नावाचा जयघोष होणार आहे.



नरेश महाराज आळंदीकर यांच्या पुढाकाराने विदर्भातील घोराड या तीर्थक्षेत्रातून आळंदी ते पंढरपूर अशी पायदळ दिंडी सुरू करण्यात आली. या दिंडीला यंदा तपपूर्ती झाल्याने, २२ ते २९ सप्टेंबर या कालावधीत पंढरपूर येथे हा सोहळा साजरा करण्यात येणार आहे. सोहळ्याच्या निमित्ताने परमार्थ आश्रम, दत्त घाट प्रदक्षिणा मार्ग येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे, ज्याचे प्रवचन दत्तात्रय महाराज पवार करणार आहेत.

सोहळ्याच्या सुरुवातीला इंदू बोडके यांच्या हस्ते ग्रंथ पूजन, मधुकर वानखेडे यांच्या हस्ते ध्वज पूजन, आणि बबन मामा कंक यांच्या हस्ते कलश पूजन होणार आहे. पुरुषोत्तम गुजरकर हे सोहळ्यात वीनेकरी म्हणून सहभाग घेणार आहेत. या सोहळ्याच्या जय्यत तयारी सुरू असून, घोराड आणि परिसरातील असंख्य भाविक या उत्सवाला हजेरी लावणार आहेत.

घोराड येथे संत केजाजी महाराज आणि त्यांचे पुत्र संत नामदेव महाराज हे दोन महान संत होऊन गेले. त्यांनी आपल्या काळात पंढरपूर पायदळ वारीची परंपरा सुरू केली होती, परंतु त्यांच्या पश्चात ही परंपरा काही काळ खंडित झाली. नरेश महाराज आळंदीकर यांनी या परंपरेला नव्याने सुरूवात केली, आणि त्यांना यंदा एक तप पूर्ण होत आहे. या दिंडीचा सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो, आणि यंदा तो चंद्रभागेच्या तीरावर पंढरपूर येथे होणार आहे.

# ड्रेनेज पाण्यामुळे घरात साचले पाणी नगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराचा परिणाम

## डॉ.रेखा चव्हाण यांनी त्वरीत उपाययोजना करण्याची मागणी

**नांदेड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले असून, अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. नैसर्गिक आपत्तींवर नियंत्रण मिळवणे अशक्य असले तरी, प्रशासनाच्या योग्य नियोजनाने नागरिकांचे होणारे हाल निश्चितपणे टाळता आले असते. मात्र, हिमायतनगर तालुक्यातील नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे हे नियोजन अपयशी ठरले आहे. पावसाच्या आठवड्यानंतरही अनेक घरांमधील पाणी अजूनही ओसरलेले नाही, परिणामी वसाहतींमध्ये दुर्गंधी पसरली असून, नागरिक आजारी पडत आहेत.



महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा आणि नांदेड जिल्हा प्रभारी डॉ. रेखा चव्हाण सध्या मतदारसंघाचा दौरा करत आहेत. दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. डॉ. चव्हाण यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या मिलीभगतीमुळे मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. या परिस्थितीमुळे जनतेत रोष निर्माण झाला आहे, आणि प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत तर हा असंतोष आणखी वाढू शकतो.

# कानडेची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर । प्रतिनिधी**

महात्मा गांधी विद्यालय करमाळा शाळेचा विद्यार्थी वेदांत उमेश कानडे याने सोलापूर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.



एसआरपीएफ मैदान, सोरेगाव येथे झालेल्या या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील विविध खेळाडूंनी सहभाग घेतला होता. गोळाफेक, धावणे, आणि लांब उडी या थलेटिक्स स्पर्धांमध्ये वेदांतने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या या उज्ज्वल यशामुळे त्याची निवड श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेसाठी झाली आहे.

या यशस्वी कामगिरीबद्दल महात्मा गांधी विद्यालयाच्या संस्थापक अध्यक्ष जयवंतराव जगताप यांनी वेदांतचा फेटा, हार, आणि नारळ देऊन सत्कार केला. यावेळी करमाळा नगर परिषदेचे नगराध्यक्ष वैभव राजे जगताप, युवा नेते शंभूराजे जगताप, शाळेचे मुख्याध्यापक बागवान , पर्यवेक्षक नवले , वर्गशिक्षक रसाळ , तसेच मार्गदर्शक सचिन दळवी , ढेरे आणि इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी वेदांतचे हार्दिक अभिनंदन करून त्याच्या आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शाळेच्या प्रांगणात रोहित्र, वीज वितरण कंपनीच्या निर्णयाने पालकांमध्ये खळबळ

**घोराड । प्रतिनिधी**

विजेपासून सुरक्षित राहण्याचा सल्ला दिला जात असताना, वीज वितरण कंपनीने चक्क जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात रोहित्र बसवून पालकांमध्ये खळबळ उडवून दिली आहे. या धाडसी निर्णयामुळे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची चिंता वाढली असून, या बाबत तात्काळ कारवाईची मागणी जोर धरत आहे.

जुवाडी ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या मेणखात गावात वीज वितरण कंपनीने नव्याने रोहित्र बसवले. मात्र, हे रोहित्र बसवताना ग्राम पंचायतची पूर्व परवानगी घेणे अनिवार्य असताना, अशा कोणत्याही परवानगीची पूर्तता करण्यात आलेली नाही. विशेषतः शाळेच्या प्रांगणात हे रोहित्र बसवण्याचा निर्णय कसा आणि कोणाच्या आदेशाने घेतला गेला, हा प्रश्न ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार न करता शाळेच्या प्रांगणात रोहित्र बसवल्यामुळे पालकांमध्ये नाराजी पसरली आहे. शाळेच्या परिसरात वीज वितरण कंपनीने असे धोकादायक उपकरण बसवल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे पालकांनी तात्काळ हे रोहित्र हटवून सुरक्षित जागी बसवावे, अशी मागणी केली आहे.या प्रकरणाबाबत सरपंच अरविंद चाफले यांना विचारले असता, वीज वितरण कंपनीने ग्राम पंचायतची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी वीज वितरण कंपनीच्या अभियंत्यांना ही बाब सांगितली असून, लवकरच हे रोहित्र सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्याचे सांगितले.



# अनगर परिसरात गौरी-लक्ष्मीचे उत्साहात स्वागत



**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील अनगर आणि परिसरातील बिटले, खंडोबाचीवाडी, वाफळे, कुरणवाडी, नालबंदवाडी, बोपले, कोंबडवाडी, देवडी, पासलेवाडी, मलिकपेठ, गलंदवाडी यांसह आदी बारा गावांमध्ये महिलांनी गौरी-लक्ष्मीचे पूजन करून मोठ्या उत्साहात स्वागत केले.गौरी-लक्ष्मीच्या आगमनासाठी महिला भाविक मोठ्या आतुरतेने वाट पाहत होत्या. नवीन लक्ष्मीच्या मूर्ती घेण्यासाठी अनगरसह इतर ठिकाणच्या आठवडा बाजारात मोठ्या प्रमाणावर महिलांची गर्दी झाली होती. गौरी-लक्ष्मीच्या स्वागतासाठी महिलांनी घरासमोर सडा टाकून आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. मानाच्या भाजी-भाकरीचा नेवैद्य दाखवून विधिवत पूजा करण्यात आली.चालू पावसाळ्यात सुरुवातीपासूनच चांगला पाऊस झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. गौरी-लक्ष्मीच्या आगमनाबरोबर मागील पाच-सहा दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसानेही हजेरी लावल्याने महिलांमध्ये अधिकच समाधानाचे वातावरण पसरले होते.

# शेलगाव क चे प्रवीण वीर रेशीम रत्न पुरस्काराने सन्मानित




**सोलापूर । प्रतिनिधी**

दि. ५ सप्टेंबर रोजी यशदा, पुणे येथे रेशीम संचालनालयाच्या वतीने रेशीम रत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सात जिल्ह्यांतील २१ शेतकऱ्यांना रेशीम रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२२-२३ मध्ये १ एकरामध्ये सर्वाधिक उत्पन्न घेतलेल्या सोलापूर जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांना रेशीम रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक प्रवीण पांडुरंग वीर (११,०००), द्वितीय क्रमांक रामा पालवे (७,५००), तृतीय क्रमांक विनोद केचे (५,०००) यांना रोख रक्कम, शाल, साडी व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी रेशीम संचालनालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, वस्त्रोद्योग विभागाच्या उपसचिव श्रद्धा कोचरेकर, सहाय्यक संचालक डॉ. कविता देशपांडे, राज्याचे कृषी संचालक सुनील बोरकर, जिल्हा रेशीम विकास अधिकारी पुणे चे संजय फुले, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार, अधीक्षक अविनाश खडस व इतर अधिकारी उपस्थित होते. रेशीम शेती ही अपारंपारिक व नाविन्यपूर्ण उद्योग असूनही प्रवीण वीर यांनी मिळवलेल्या यशामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय फुले यांनी केले, तर रेशीम विकास अधिकारी राजेश कांबळे यांनी आभार मानले.

> **२०१८ साली रेशीम व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला अपयश आले. तालुक्यात रेशीम व्यवसायाचा प्रचार आणि प्रसार झालेला नसल्यामुळे मार्गदर्शन मिळत नव्हते. परंतु, जिल्हा रेशीम कार्यालय सोलापूर यांच्याशी जोडल्यानंतर आमच्या रेशीम व्यवसायाचा कायापालट झाला. जिल्हा रेशीम अधिकारी विनीत पवार आणि त्यांचे सहकारी यांच्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आम्ही भरघोस रेशीम उत्पन्न घेऊ शकलो.**
> **- प्रवीण पांडुरंग वीर**

# लक्ष्मीच्या पावलांनी गौराईचे आगमन,घराघरात उत्साहाचे वातावरण

**सोलापूर । प्रतिनिधी**

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर अवघ्या दोन दिवसांनी मंगलमूर्ती गौराईचे घराघरात आगमन झाले. मंगळवारी (ता. १०) सकाळपासूनच शहरात गौराईच्या आगमनासाठी सजावटीची तयारी सुरु होती. महिलांसह घरातील तरुणींनी गौरीच्या सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्यासाठी बाजारात गर्दी केली. लाडक्या गणरायापाठोपाठ गौराईचे मोठ्या धुमधडाक्यात आणि उत्साहात स्वागत करण्यात आले. घराघरांत पारंपरिक विधीनुसार गौराईची पूजा करण्यात आली आणि सर्वांच्या कुशल-मंगलासाठी प्रार्थना करण्यात आली.

गौराई आगमनाचा मुहूर्त संध्याकाळी ८:०२ वाजेपर्यंत होता, त्यामुळे बहुतेक घरांत संध्याकाळीच गौराईंचे आगमन झाले. लक्ष्मी आली... सोन्या-रुप्याच्या पावलांनी लक्ष्मी आली... अशा पारंपरिक गीतांनी माहेरवाशीण गौराईचे स्वागत करण्यात आले. केत्तूर (ता. करमाळा) परिसरात महालक्ष्मी म्हणजे ज्येष्ठा गौरी आणि कनिष्ठा गौरींचे आगमन आनंदात आणि उत्साहात झाले. यावेळी लहानग्यांमध्येही मोठा उत्साह दिसून आला.

महिलांनी गौराईला आमंत्रण देऊन, बुधवारच्या दिवशी गौराईच्या दर्शनासाठी शेजारीपाजारी आणि मित्रपरिवार येणार असल्याचे सांगितले. यानंतर विधिपूर्वक गौरींची मखरामध्ये स्थापना करण्यात आली. पूजेसाठी लागणारे साहित्य, सजावटीचे साहित्य, आकर्षक विद्युत रोषणाई, फळे, फुले, विड्याची पाने, भाज्या यांना मोठी मागणी होती.



गौराईंच्या आगमनाने संपूर्ण वातावरण मंगलमय झाले असून, घराघरांत गौराईंची स्थापना करून त्यांचे पूजन करण्यात आले. गौराईसोबत त्यांच्या लहान बालकांचेही घरात स्वागत करण्यात आले. गौराईभोवती आकर्षक सजावट करून मंडप उभारला गेला आहे. त्यांना नव्या साड्या, दागिने आणि आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात आले आहे. गौराईच्या दर्शनासाठी आणि पूजेसाठी बुधवारचा दिवस महत्त्वाचा मानला जातो. या निमित्ताने सोशल मीडियावरही तरुणाईत उत्साह दिसून येत आहे. प्रतिष्ठापना केलेल्या गौराईच्या सजावटीची छायाचित्रे व्हाट्सअॅप आणि फेसबुकवर शेअर करण्यात येत आहेत, ज्यातून या सणाच्या महत्त्वाची प्रचिती येते.

# काावडी येथे शिवसेना (उबाठा) गटाची शाखा स्थापन
# जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या हस्ते उद्घाटन

## गाव तिथे शाखा अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**भद्रावती । प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक या अभियानांतर्गत तालुक्यातील कावडी येथे नव्या शाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. जिल्हाप्रमुख तथा वरोरा-भद्रावती विधानसभा प्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या हस्ते शाखेच्या फलकाचे उद्घाटन करण्यात आले. गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना पक्षाच्या योगदानावर भर देण्यात आला.

मुकेश जिवतोडे यांनी या प्रसंगी गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, समस्यांवर चर्चा केली आणि गावाच्या प्रगतीसाठी पक्षाचे सक्रिय प्रयत्न सुरूच राहतील, असे आश्वासन दिले. त्यांनी स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देऊन, शेतकरी, विद्यार्थी, तरुण आणि महिला यांच्या कल्याणासाठी शाखेच्या माध्यमातून काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. गावकऱ्यांनी यावेळी विविध विषयांवर मोकळेपणाने आपली मते मांडली, ज्यात गावातील मूलभूत सुविधांच्या बाबतीत सूचना देण्यात आल्या. मुकेश जिवतोडे यांनी तातडीने यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आणि येणाऱ्या काळात अधिक चांगले बदल घडविण्यासाठी शिवसेनेची बांधिलकी पुन्हा एकदा ठामपणे मांडली.शाखेच्या उद्घाटनामुळे गावात नवीन उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिवसेना पक्षाने कावडी येथे गावाच्या उन्नतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.या कार्यक्रमात उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड,युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर,कामगार सेना सचिव धनराज कुमरे,शाखा प्रमुख गणेश पोटे,उपशाखा प्रमुख विकास बावणे सचिव मयूर सिडाम,लकी अन्सारी,निलेश पोटे , निकेश निखाडे ,गौरव पारशिवे नागलोन तंटामुक्ती अध्यक्ष चेतन ढवस कुचना शाखाप्रमुख टपू कुळसंगे,अरुण किन्नर,रुपेश पोटे,नंदकिशोर पारखी, गणेश तोडासे, संदीप मुसळे , देवराव तोडासे, पांडुरंग सोनुले, अशोक ठाकरे , नथू देरकर , पिंटू खिरटकर ,शुभम दाते, राजू सिडाम, गणेश सातघरे , राहुल सातघरे ,उमेश डाखरे ,शांमभाऊ टोंगे , इशांत पोटे , सुनिल पोटे , अर्जुन पोटे , प्रकाश बावणे ,पूजराम निखाडे , रवि बावणे , अनिल पोटे , निलेश पोटे , प्रमोद सोनुले ,अक्षय गाफाडे , जगन बावणे , अनिल माताडे , मंगेश बावणे , आनंद डोंगे , निशांत चौहान व आदी उपस्थित होते.

# शिक्षक संचमान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या अन्यायकारक शासन निर्णयाच्या रद्दबाबत मागणी

## महा.पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

१५ मार्च २०२४ चा शिक्षक संचमान्यतेचा शासन निर्णय आणि ५ सप्टेंबर २०२४ चा कंत्राटी शिक्षक भरतीचा शासन निर्णय बेरोजगार आणि सामान्य नागरिकांवर अन्यायकारक ठरत असल्याने यास विरोध दर्शविण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री महा. शासन यांना निवेदन देऊन यावर लक्ष वेधण्यात आले. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ अन्वये शिक्षक निश्चितीचे निकष सन २०११ पासून आपल्या राज्यात लागू आहेत. या अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्राथमिक स्तर (इयत्ता १ ते ५) व उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता ६ ते ८) या वर्गांवर आधारित आकृतीबंध अद्याप लागू केलेला नाही. शासन निर्णय झाले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्यामुळे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या



अधिकाराचा भंग होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे शिक्षक निश्चितीचे जाहीर केलेले निकष वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने हा निर्णय रद्द करण्याची मागणी महा. पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

वाडीवस्तीवर जन्म झालेल्या विद्यार्थ्यांना पटसंख्येअभावी शिक्षक कमी करून दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवणे हा त्यांच्या हक्कांचा भंग आहे. प्रत्येक वर्गात १ विद्यार्थी असला तरी इयत्ता १ ते ४ च्या शाळेत किमान २ नियमित शिक्षकांची आवश्यकता आहे. त्यामुळे १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील निकष हे अन्यायकारक असल्याने ते रद्द करण्याची मागणी पुरोगामी संघटनेने केली आहे.

त्याचबरोबर ५ सप्टेंबर २०२४ च्या कंत्राटी शिक्षक नियुक्तीच्या शासन निर्णयाचाही विरोध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आणि वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, यासाठी या दोन्ही शासन निर्णयांना तातडीने रद्द करण्याची मागणी समितीने केली आहे.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनावर जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार, सुरेश गिलोरकर, सुनिल कोहपरे, गंगाधर बोढे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन देताना संघटनेचे राज्य नेते विजय भोगेकर, जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर, कार्यालयीन सचिव दिवाकर वाघे, ओमदास तुराणकर, मनोहर बकाने, संजय पडोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. अशी माहिती जिल्हा प्रसिद्धी प्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी दिली.

# पालकमंत्र्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना मिळणार पीक विम्याचा लाभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अपार प्रयत्नांमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत उर्वरित ५८.९५ कोटी रुपये मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



ऑगस्ट महिन्यात सुधीर मुनगंटीवार यांनी पीक विमा योजनेच्या अडचणींबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिस्थिती स्पष्ट केली होती. जरी राज्य शासनाने अर्थसंकल्पामध्ये पीक विमा योजनेसाठी तरतूद केली असली, तरी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने शेतकऱ्यांना विम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ केली होती. यामुळे शेतकऱ्यांकडून अनेक तक्रारी झाल्या.

या तक्रारींची दखल घेतल्यावर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर आणि मुंबईत तातडीच्या बैठका घेतल्या. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी संवाद साधून परिस्थिती स्पष्ट केली. शेतकऱ्यांना उर्वरित रक्कम मिळाल्यास त्यांचे पुढील शेतीचे नियोजन सोपे होईल आणि सणासुदीच्या काळात त्यांना आधार मिळेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

सध्या जिल्ह्यातील ३ लाख ५० हजार ९७६ शेतकऱ्यांनी पीक विमा घेतला होता. खरीप हंगाम २०२३ मध्ये सोयाबीन, कापूस व धान या पिकांना नुकसान झाल्यामुळे १ लाख ५१ हजार ३३२ शेतकऱ्यांना २०२.७६ कोटी रुपये विमा रक्कम देय ठरवण्यात आली. त्यापैकी १४३.८१ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत, मात्र उर्वरित ५८.९५ कोटी रुपये अद्याप प्रलंबित आहेत.या सर्व परिस्थितीला धीर देत, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उर्वरित शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम लवकरच देण्याची ग्वाही दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याने त्यांचे कुटुंबीय आणि शेतीच्या पुढील योजनांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

# महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी नितीन मायकरकार यांची सलग सातव्यांदा निवड

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत कोसरसारमध्ये आज ग्रामसभा पार पडली. या ग्रामसभेत गावाच्या सुधारणा आणि विकास कामांच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांची माहिती देण्यात आली. ग्रामसभा अध्यक्ष म्हणून गावातील प्रथम नागरिक गणेश मडावी यांनी अध्यक्षपद भूषविले.

महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या पुनर्निर्मितीसाठी या ग्रामसभेत प्रस्ताव मांडण्यात आला. यात सलग सातव्यांदा नितीन मायकरकार यांची एकमताने निवड करण्यात आली. गावातील तंटे मिटविण्यासाठी मी नेहमीच तत्पर आहे, आणि ग्रामस्थांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास सलग



सातव्यांदा अविरोध निवडून दिल्याने अधिकच दृढ झाला आहे, असे प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले. या निवडीच्या प्रसंगी सरपंच गणेश मडावी, उपसरपंच अमित बहादुरे, सचिव कावळकर, ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

# ग्रंथ प्रदर्शनामुळे वैचारिक चळवळीला चालना-गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे

**सोलापूर । प्रतिनिधी**

ग्रंथ प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना विविध पुस्तकांची माहिती होऊन त्यांच्या ज्ञानात भर पडते आणि त्यातून एक वैचारिक चळवळ निर्माण होते, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांनी केले. ते शिक्षण विभाग पंचायत समिती करमाळा आयोजित तालुकास्तरीय ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.



करमाळा तालुकास्तरीय ग्रंथ प्रदर्शन ६ सप्टेंबर रोजी कर्मवीर अण्णासाहेब जगताप विद्यालय करमाळा येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात, सुरुवातीला विद्यार्थ्यांसोबत ग्रंथदिंडी काढण्यात आली. गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी म्हणून ग्रंथ प्रदर्शनाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, सध्याच्या मोबाईलच्या युगात वाचनाची सवय कमी होत आहे. अशा परिस्थितीत ग्रंथ प्रदर्शन विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखिका आणि प्राध्यापक अंजली श्रीवास्तव होत्या. या वेळी करमाळा तालुक्यातील नवोदित कवी आणि लेखकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला करमाळा तालुक्यातील सर्व शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी आणि मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्ताराधिकारी नितीन कदम, अण्णासाहेब जगताप विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील जाधव, उपमुख्याध्यापक दत्तात्रय भस्मे, नवोदित कवी दीपक लांडगे आणि शाम माने, लेखक अजित कणसे, संतोष पोतदार, विषय साधन व्यक्ती कैलास जाधव, प्रवीण बांगर आणि तालुका समन्वयक अशोक माने या सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवणनाथ आदलिंग यांनी केले तर आभार प्रदर्शन मिनीनाथ टकले यांनी केले.

# केडगाव परिसरात राडा! पठारे टोळीकडून जीवघेणा हल्ला;भाजप पदाधिकारी जखमी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील केडगाव परिसरात जागेचा वादातून भाजप पदाअधिकाऱ्यास पठारे टोळीने जीवे मारण्याच्या उददेशाने हल्ला केल्याची घटना घडली आहे. जखमी भाजप पदाअधिकारी निलेश भाऊसाहेब सातपुते ( केडगाव, जि. ता. अहमदनगर ) यांनी कोतवाली पोलीस फिर्याद दिली आहे.या प्रकरणी विजय मोहण पठारे, राजेंद्र मोहन पठारे, प्रशांत बारस्कर, अजय राजु पठारे, विजय राजू पठारे, आकाश औटी, मयुर चावरे, सनी भुजबळ, राहुल झेंडे, गितेश ऊर्फ भैया पवार, राकेश टोकळ, परशुराम बुधाळे, सोनु परदेशी, आकाश सांगळे, विशाल दळवी, अंशु चव्हाण, अजय वुचाळे (सर्व रा.अहमदनगर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुणे-नगर महामार्गावरील हॉटेल रंगोलीच्या पाठीमागे दि. ०९ सप्टेंबर रोजी सदरचा प्रकार घडला. फिर्यादी यांचे जागेवर बांधलेल्या अवैध्य बांधकामाबाबत दिलेल्या तक्रारी अर्जाचा राग मनात धरुन आरोपी पठारे टोळीने कट रचून जिवे ठार मारण्याचे उददेशाने घातक हत्याराने फिर्यादी यांच्यावर हल्ला केला.तसेच तसेच गळयातील सोन्याची साखळी देखील जबरदस्तीने ओरबडून नेले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. जखमी भाजप पदाअधिकारी निलेश भाऊसाहेब सातपुते याच्यावर नगर मधील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करत आहे.



**दैनिक सह्याद्रीचा राखणदार चे वैजापूर (संभाजीनगर) प्रतिनिधी, अर्जुन शिंदे त्यांच्या पत्नी अर्चना अर्जुन शिंदे, मुलगी शिवभक्ती शिंदे आणि त्यांचे मित्र हुकुम पगार , अनिता हुकूम पगार, गोटीराम वाघ , रंजना गोटीराम वाघ ,भाऊसाहेब सोनवणे ,रेखा सोनवणे यांच्यासह गोळवाडी येथील सार्वजनिक गणेश मंडळातील श्रींचे दर्शन घेतले. या खास प्रसंगी टिपलेले छायाचित्र.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .